दैनिक

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

# महावृत्त

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक २३७ वा शुक्रवार दि.१४ मार्च २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.







## राज ठाकरे-उद्धव ठाकरे एकत्र येणार?



मुंबई : प्रतिनिधी राज्यात लोकसभा आणि विधानसभा निवडणुका पार पडल्यानंतर सध्या सर्वच पक्षांकडून महापालिका निवडणुकांची तयारी केली जात आहे. त्यातच विधानसभा निवडणुकीनंतर ठाकरे बंधूंनी एकत्र यावे अशी भावना सर्वच मराठी माणसांकडून व्यक्त केली जात आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे आणि शिवसेना उद्धव ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे हे एकत्र यावेत यासाठी आता मुंबईतील मराठी सेना ॲक्शन मोडमध्ये आली आहे. येत्या गुढीपाडव्याच्या निमित्ताने ठाकरे बंधू मिलन कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. मुंबईत हा कार्यक्रम पार पडणार आहे.

राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी एकत्र यावे यासाठी मुंबईतील मराठी सेना ॲक्शन मोडमध्ये आली आहे. येत्या ३० मार्च रोजी ठाकरे बंधू मिलनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. यापूर्वी मराठी सेना पक्षाने दादर सेना भवन परिसरात राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी एकत्र यावे अशा आशयाचे बॅनर लावले होते. त्यानिमित्ताने आज बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिस्थळावर निमंत्रण पत्रिका ठेवली आहे. ही निमंत्रण पत्रिका ठेवून बंधुत्वाचा संदेश देण्याचा प्रयत्न सुरू करण्यात आला आहे. येत्या गुढीपाडव्याला हा कार्यक्रम पार पडणार आहे. या कार्यक्रमासाठी राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांना निमंत्रित केले जाणार आहे. निमंत्रण पत्रिकेत काय? बंधू मिलन निमंत्रण, भाऊ माझा आधार, माझ्या ध्येयाचा किनारा, आयुष्याच्या प्रत्येक सुख-दु:खाचा सोबती, भाऊ माझ्या जीवनाचा आधार. बंधू मिलन कार्यक्रम दिनांक ३० मार्च २०२५ रोजी छत्रपती शिवाजी महाराज मैदान मुंबई येथे सकाळी ११ वाजता स्व. बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिस्थळाजवळ घेण्याचे योजिले आहे. मराठी माणसाच्या हितासाठी एकत्र येणे ही काळाची गरज आहे, तरी आपली उपस्थिती वंदनीय असेल, असे या निमंत्रण पत्रिकेत नमूद करण्यात आले आहे. मोहनिश रवींद्र राऊळ यांनी ही निमंत्रण पत्रिका बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिस्थळावर ठेवली आहे. महाराष्ट्राला सध्या या दोघांची गरज आज होळीचा सण आहे, त्यामुळे होळीला सर्व काही विसरून राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी एकत्र यावे. बंधू बंधूसाठी धावून येतो. महाराष्ट्राला सध्या या दोघांची गरज आहे. तसेच एका सक्षम नेतृत्वाची गरज आहे. मराठी माणूस मराठी माणसासोबत भांडतो. दोन गटांत विभाजन झाले आहे.

## आजपासून लातुरात पीव्हीआर मध्ये इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवल मान्यवरांच्या हस्ते होणार उद्घाटन लातूर सह मराठवाड्यातील सिने रसिकांनी लाभ घ्यावा माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांचे आव्हान

लातूर / प्रतिनिधी :- महाराष्ट्र शासन विलासराव देशमुख फाऊंडेशन, पुणे फिल्म फाऊंडेशन यांच्या संयुक्त विदयमाने लातूर येथे आयोजित तिसऱ्या लातूर इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवलचा शुक्रवार, दि. १४ मार्च २०२५ रोजी सायं. ६ वाजता शुभारंभ होत असून तो तीन दिवस म्हणजे १७ मार्च पर्यंत चालणार आहे. हा फेस्टिवल सर्वांसाठी नि:शुल्क असून लातूर तसेच मराठवाडयातील सिनेरसीकांनी या फिल्म फेस्टिवलचा आनंद घ्यावा असे आवाहन मांजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी केले आहे. आज पासून लातूर येथील पीव्हीआर टॉकीज येथे सुरू होणाऱ्या तिसऱ्या लातूर इंटरनॅशनल फिल्म फेस्टिवलचा शुभारंभ राज्याचे माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक खात्याचे मंत्री श्री आशिष शेलार यांच्या हस्ते तर लातुरचे पालकमंत्री श्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या अध्यक्षतेखाली होईल. सन्माननीय अतिथी म्हणून सहकार मंत्री ना. बाबासाहेब पाटील व पुणे फिल्म फेस्टिवलचे अध्यक्ष व ख्यातनाम चित्रपट दिग्दर्शक श्री जब्बार पटेल व माजी वैद्यकीय व सांस्कृतिक मंत्री आ. अमित देशमुख हे उपस्थित असतील. याशिवाय धाराशिवचे खा. ओमप्रकाश राजे निंबाळकर, लातुरचे खा. शिवाजी काळगे, आ.विक्रम काळे, आ.सतीश चक्षण, आ. संभाजीराव पाटील निलंगेकर, माजी क्रीडामंत्री आ. संजय बनसोडे, आ. रमेशअप्पा कराड, आ. अभिमन्यू पवार आदी मान्यवर प्रामुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच सांस्कृतिक खात्याचे अपर मुख्य सचिव श्री विकास खारगे, सांस्कृतिक खात्याचे संचालक श्री विभीषण चावरे, दादासाहेब फाळके चित्रनगरीच्या व्यवस्थापकीय संचालक स्वाती म्हसे पाटील, लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, लातूर जि.प. चे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री राहुलकुमार मीना, लातुरचे जिल्हा पोलीस अधीक्षक की सोमय मुंढे, व लातूर महानगरपालिकेचे आयुक्त श्री बाबासाहेब मनोहरे आदी उद्घाटन समारंभाला पाहूणे म्हणून उपस्थित राहणार असल्याची माहीती संयोजकांनी दिली आहे. नॉर्वेजियन चित्रपटाने सुरुवात फिल्म फेस्टिवलचे उद्घाटन 'आर्मंड' या नॉर्वे जियन चित्रपटाने होणार आहे. हाफडन उल्मन टोंडेल या तरूण दिग्दर्शकाचा हा पहिलाच चित्रपट असून यामध्ये पौगंडावस्थेतील मुलांच्या लैंगीक समस्या यावर प्रकाश टाकण्यात आला आहे. ही अतिशय उत्कृष्ट अशी प्रायोगिक कलाकृती आहे. महोत्सवाचा समारोप 'टू ए लॅन्ड अन्नोन' या चित्रपटाने होणार आहे. मराठी चित्रपटांमध्ये मराठवाड्यातील दिग्दर्शकाची कलाकृतीचित्रपट महोत्सवात 'स्नो फ्लावर' (दिग्दर्शक- गजेंद्र अहिरे), 'सांगळा' (दि. रावबा गजमल) व 'निर्जळी' (दि. स्वाती कडू) हे तीन मराठी चित्रपट आहेत. यातील रावबा गजमल हे मराठवाड्यातील कलावंत असून त्यांनी आतापर्यंत काही शॉर्ट फिल्म केल्या आहेत. हा त्यांचा पहिलाच चित्रपट आहे. याशिवाय चार चित्रपट इतर भारतीय भाषांमधील आहेत. यामध्ये 'इन रिट्रिट' (दि. मैसम अली), 'तारीख', (दि-हिमज्योती तालुकदार), 'लेव्हल क्रॉस' (दि-अरफाज आयुब) व 'लच्ची' (दि-कृष्णेगौडा) या चार चित्रपटांचा समावेश आहे. जागतिक चित्रपट: महोत्सवात १६ जागतिक चित्रपट आहेत. यामध्ये 'प्लास्टीक गन', 'डेलीरियो' 'डार्क मॅटर, 'ब्लॅक टी', 'आउट ऑफ सिझन', 'मदर्स किंग्डम, 'शहिद', 'व्हीएत ंड नाम' आदी उल्लेखनीय आहेत. अशा रसिकप्रिय चित्रपटांची मेजवानी चार दिवस चालणाऱ्या या महोत्सवात प्रेक्षकांना मिळणार आहे. हा फेस्टिवल जनतेसाठी खुला असून यात नि:शुल्क प्रवेश आहे. चित्रपटांसाठी कसलीही प्रवेशिका नाही. जे आधी येतील त्यांना उपलब्धतेनुसार जागा मिळेल. जिल्ह्यातील चित्रपट प्रेमींनी चार दिवसीय फिल्म फेस्टिवलचा आनंद घ्यावा, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

## विलास सहकारी साखर कारखाना निवडणुकीसाठी विलासराव देशमुख सहकार पॅनलकडून उमेदवारी अर्ज दाखल



लातूर/ प्रतिनिधी :- विलास सहकारी साखर कारखाना संचालक मंडळाच्या २१ जागासाठी होत असलेल्या निवडणुकीसाठी राज्याचे माजी मंत्री आमदार, संस्थापक चेअरमन अमित विलासराव देशमुख यांच्या नेतृत्वाखालील विलासराव देशमुख सहकार पॅनलच्या २१ उमेदवाराचे अर्ज अर्ज दाखल केले आहेत. राज्याचे माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या युवा नेतृत्वात स्थापन झालेल्या विलास साखर कारखान्याने मागच्या २५ वर्षात उत्कृष्ट कार्य व व्यवस्थापनाची अनेक उच्चांक प्रस्तापीत करुन साखर कारखानदारी क्षेत्रात आदर्श निर्माण केला. या माध्यमातून लातूर तालुका व जिल्हयात आर्थिक क्रांती घडवली आहे. ग्रामिण जीवनमान उंचावले आहे. राज्याचे माजी मुख्यमंत्री माजी केंद्रीय मंत्री आदरणीय विलासराव देशमुख यांचे प्रेरणा, माजी मंत्री सहकार महर्षी दिलीपराव देशमुख, विदयमान चेअरमन वैशाली विलासराव देशमुख, माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली मावळत्या संचालक मंडळाने अत्यंत उत्कृष्टरीत्या काम करून ऊसउत्पादक शेतकरी, कामगार, शेतमजूर यांच्या जीवनमान उंचावण्यासाठी अत्यंत उत्तम काम केले आहे. मांजरा परीवारात स्थापन झालेला आणि अत्यंत कडकशीस्तीच्या वातावरणात वाटचाल करीत असलेला विलास सहकारी साखर कारखान्याने एकुण २४ गळीत हंगामात ३६ पेक्षा अधिक राज्य आणि देशपातळीवरील पुरस्कार आणि पारीतोषीके मिळवली आहेत. नेहमीच आधुनीक तंत्रज्ञान आणि प्रयोगशीलतेचा अवलंब करीत उसउत्पादकांना अधिकांत अधिक लाभ मिळवून देण्याचा प्रयत्न या कारखान्याच्या माध्यमातून झालेला आहे. संचालक मंडळाने फक्त विश्वस्थांची भुमिका निभावल्यामुळे प्रत्येक सभासद शेतकऱ्यांला हा कारखाना आपल्याच मालकीचा असल्याचा विश्वास वाटतो आहे. यावेळी कारखान्याच्या नेतृत्वाकडून संचालक मंडळासाठी उमेदवार निवडतांना अनुभवी आणि नवख्या उमेदवारांचा उत्तमरीतीने समावेश केला आहे. आता पर्यंतच्या संचालक मंडळातील ५ जुने संचालक, ८ विदयमान संचालक तर ८ नवीन प्रतिनीधी यांचा या २१ उमेदवारात समावेश आहे. विलासराव देशमुख सहकार पॅनलमध्ये उमेदवारी मिळालेल्या सर्व उमेदवारांनी सहकार क्षेत्रातील मान्यवर नेते व पदाधिकारी यांच्यासह बुधवार दि. १२ मार्च रोजी दुपारी लातूर जिल्हा परीषद प्रागंणातील माजी मुख्यमंत्री आदरणीय विलासराव देशमुख यांच्या पुर्णाकृती पुतळयास अभिवादन करुन लातूर येथे उपविभागीय अधिकारी तथा निवडणुक अधिकारी रोहिणी नऱ्हे विरोळे यांच्या कार्यालयात उमेदवारी अर्ज दाखल केले. विलासराव देशमुख सहकार पॅनलमधून उत्पादक सहकारी संस्था, बिगर उत्पादक संस्था व पणन संस्था मतदारसंघ देशमुख अमित विलासराव, महीला प्रतिनीधी देशमुख वैशाली विलासराव देशमुख लताबाई रमेश, उसउत्पादक मतदारसंघ निवळी (वैशालीनगर) गट काळे रविंद्र व्यंकटराव, बुलबुले नरसिंग दगडू, पटेल रसुल दिलदार, शिराळा गट पालकर तात्यासाहेब छत्तू, पाटील रंजीत राजेसाहेब, मोरे गोवर्धन मोहनराव, कासारजवळा गट शिंदे वैजनाथराव ग्यानदेवराव, बारबोले आनंत व्यंकटराव, पवार हणमंत नागनाथराव, विलासनगर (चिंचोलीराववाडी) गट साळुंके (देशमुख) नेताजी शिवाजीराव, पाटील नितीन भाऊसाहेब, साळुंके रामराव विश्वनाथ, बाभळगाव गट देशमुख अमित विलासराव, जाधव अमृत हरिश्चंद्र, शिंदे (पाटील) सतिष विठ्ठलराव, अनुसुचीत जाती प्रतिनीधी बनसोडे दिपक अर्जुन, इतर मागसवर्गीय प्रतिनीधी बरुरे शाम भारत, भटक्या विमुक्त जाती व जमाती विशेष मागास प्रवर्ग माने सुभाष खंडेराव यांचा समावेश आहे. उमेदवारी अर्ज दाखल करतांना उमेदवारा सोबत लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, लातूर कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, विलास को-ऑपरेटिव बँकेचे व्हाईस चेअरमन समद पटेल ट्वेंटीवन शुगरचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख आदिसह विद्यमान संचालक मंडळ व काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी यांच्यासह ऊसउत्पादक शेतकरी सभासद मोठया संख्येने उपस्थित होते.




विभागीय सहनिबंधक मा. सुनिल शिरापुरकर लातूर यांना विभागातील चार जिल्ह्यातील जिल्हा उपनिबंधक यांना प्रमाणित लेखापरीक्षकांना आयडेंटिटी कार्ड देण्याबाबत निवेदन देण्यात आले यावेळी विभागीय अध्यक्ष अनिल पाटील नांदेड जिल्हा अध्यक्ष संभाजी सूर्यवंशी लातूर विभागीय कोषाध्यक्ष श्री रवींद्र हरबडे व लातूर जिल्हा अध्यक्ष श्री दीपक वांगस्कर तसेच नांदेड जिल्हा कोषाध्यक्ष राजेश सालेगावकर उपस्थित होते.

## माजी मंत्री आ.संजय बनसोडे यांच्याकडुन सोनकांबळे कुटूंबियांचे सांत्वन



उदगीर : मयत तानाजी बाबुराव सोनकांबळे या मजुराच्या उदगीर येथील शिवशक्ती नगर येथील घरी माजी क्रीडामंत्री आमदार संजय बनसोडे यांनी आज भेट देवुन सोनकांबळे कुटुंबियांचे सांत्वन केले व शासनस्तरावरुन त्यांना मदत करण्यासाठी माझे प्रयत्न सुरु असल्याचे सांगून मी आपल्या कुटुंबाच्या पाठीशी असल्याचे सांगितले. यावेळी उपजिल्हाधिकारी सुशांत शिंदे, तहसीलदार राम बोरगावकर, ग्रामीणचे पोलिस निरीक्षक राजकुमार पुजारी, मुख्याधिकारी सोमनाथ जाधव, उदगीरचे तलाठी पंकज कांबळे, बालाजी भोसले, सय्यद जानीमियाँ, प्रा.शिवाजीराव देवनाळे, पंडित सुर्यवंशी, अनिल मुदाळे, राजकुमार भालेराव, प्रदिप जोंधळे, बालाजी गोटमुकले, अजित कांबळे, जवाहरलाल कांबळे, राजकुमार चव्हाण, श्याम डावळे, आदी उपस्थित होते.

## सर्व तालुकास्तरीय, जिल्हास्तरीय कार्यालयांनी सात कलमी कृती कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करावी-जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे




लातूर :- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी क्षेत्रीय कार्यालयांना दिलेल्या शंभर दिवसांच्या सात कलमी कार्यक्रमाची जिल्ह्यातील सर्व तालुका व जिल्हास्तरीय कार्यालयांनी प्रभावी अंमलबजावणी करावी. या कामाचे मूल्यमापन करण्यात येणार असून त्यादृष्टीने सर्व कार्यालय प्रमुखांनी केलेल्या कामकाजाचा अहवाल तयार करणे आवश्यक असल्याचे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे म्हणाल्या. शंभर दिवसीय कार्यक्रमाच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी आयोजित सर्व जिल्हा व तालुकास्तरीय अधिकाऱ्यांच्या बैठकीत जिल्हाधिकारी बोलत होत्या. जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त बाबासाहेब मनोहरे, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हाधिकारी संदीप कुलकर्णी, जिल्हा नियोजन अधिकारी सोमनाथ रेड्डी यांच्यासह विविध विभागांचे विभागीय, जिल्हास्तरीय अधिकारी यावेळी उपस्थित होते. तसेच तालुकास्तरीय अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. शंभर दिवसांच्या सात कलमी कृती कार्यक्रमात जिल्ह्यातील प्रत्येक जिल्हास्तरीय व तालुकास्तरीय कार्यालयाचा सहभाग आवश्यक आहे. या उपक्रमात दुसऱ्या टप्प्यात सहभागी झालेल्या कार्यालयांनी ३० एप्रिलपर्यंत सात कलमी कृती कार्यक्रमाची अंमलबजावणी करून २ मे रोजी त्याबाबतचा अहवाल सादर करावा. कार्यालयातील अभिलेखांचे वर्गीकरण, कार्यालय व परिसराची स्वच्छता, क्षेत्रीय भेटी आदी बाबींवर विशेष लक्ष द्यावे, असे जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे म्हणाल्या. प्रत्येक कार्यालयात दिशादर्शक फलक, नागरिक व कर्मचाऱ्यांसाठी पिण्याचे स्वच्छ पाणी, सूचना पेटी, त्या कार्यालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजनांचे माहिती फलक आदी बाबी कार्यालयात असाव्यात. तसेच स्वच्छतेला प्राधान्य दिले जावे, असे जिल्हाधिकारी म्हणाल्या. तसेच पुढील आठवड्यापासून अचानक विविध कार्यालयांना भेटी देवून तेथील कामकाजाचा आढावा घेणार असल्याचे त्यांनी सांगितले. सात कलमी कृती कार्यक्रम अंतर्गत समाविष्ट बाबी आणि त्याअनुषंगाने करण्यात आलेल्या कार्यवाहीचा जिल्हाधिकारी यांनी यावेळी आढावा घेतला.

## संपादकीय....

# धुरकटेली शहरे

कधीकाळी हवामान बदल, पर्यावरण, प्रदूषण हे विषय पंचतारांकित हॉटेलातील चर्चासत्रे आहेत, त्यांचा आपल्याशी काहीही संबंध नाही, असे मानले जात होते; पण गेल्या काही वर्षांत संपूर्ण जगावरच हवामान बदल व तापमानवाढीचे संकट कोसळले आहे. त्यातच प्रचंड क्षमतेच्या कारखान्यांमधून सुटणारा धूर, प्रक्रिया न करता प्रदूषित द्रव्ये नदीत व समुद्रात सोडणे आणि लाखो वाहनांतून होणार्या प्रदूषणामुळे सार्वजनिक आरोग्यावर प्रतिकूल परिणाम होत आहे. श्वसनाच्या रोगापासून ते कर्करोगापर्यंत विविध आरोग्य समस्यांचे मूळ प्रदूषणात आहे, यावर तज्ज्ञांचे एकमत होऊ लागले आहे. दुर्दैवाने आजही आपण याबाबत पुरेसे जागे व्हायला तयार नाही. जगातील २० सर्वाधिक प्रदूषित शहरांपैकी १३ शहरे ही भारतातील आहेत, असा 'स्विस एअर क्वालिटी टेक्नॉलॉजी कंपनी'च्या जागतिक वायू गुणवत्ता अहवालाचा निष्कर्ष आहे. जागतिक स्तरावर दिल्ली सर्वात प्रदूषित राजधानीचे शहर आहे. या यादीत आसाम व मेघालयाच्या सीमेवर असणारे बर्निहाट हे शहरही असून, त्यास तेथील कारखान्यांतून होणारे कर्बोत्सर्जन जबाबदार आहे, तर दिल्लीत भाताचे खूंट जाळणे, वाहनांमधून सोडण्यात येणारा धूर, फटाक्यांमुळे वातावरण धुरकटलेले असते. मुल्लानपूर, फरिदाबाद, लोणी, गुरुग्राम, गंगानगर, नोएडा व ग्रेटर नोएडा, भिवंडी, मुझफ्फरनगर, हनुमानगडचा समावेश जगातील सर्वाधिक प्रदूषित शहरांत आहे.

२०२४ मध्ये भारत जगातील ५ व्या क्रमांकाचा सर्वाधिक प्रदूषित देश ठरला आहे. २०२३ मध्ये भारत तिसर्या क्रमांकावर होता. आता भारतातील प्रदूषणात किंचित घट झाली आहे. अतिसूक्ष्म धूलिकणांमध्ये ७ टक्क्यांनी घट झाली; पण दिल्लीतील वायू प्रदूषणात मात्र आणखी वाढ झाली आहे. तेथील अतिसूक्ष्म धूलिकण २०२३ मध्ये प्रतिघनमीटर १०२.४ मायक्रोग्राम होते, ते २०२४ मध्ये १०८.३ मायक्रोग्राम प्रतिघनमीटरपर्यंत वाढले आहेत. वायू प्रदूषण ही गंभीर समस्या असून, त्यामुळे आयुर्मान अंदाजे ५.२ वर्षांनी कमी होत असते, असे तज्ज्ञांचे मत आहे. पाकिस्तानातील ४ शहरे, तर चीनमधील एक शहर जगातील या यादीमध्ये आहे. महाराष्ट्रासारख्या प्रगत राज्यातील परिस्थितीही चांगली नाही. महाराष्ट्राचा पाहणी अहवाल नुकताच जाहीर झाला असून, यामध्ये ठाणे जिल्ह्यातील प्रदूषणकारी कारखान्यांची चिंताजनक माहिती समोर आली आहे. जिल्ह्यातील ४,८९५ कारखान्यांचा प्रदूषण निर्देशांक ६० हून अधिक म्हणजेच प्रदूषणकारी आहे. यामध्ये कल्याण प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अखत्यारीतील २,५५७ सर्वाधिक प्रदूषणकारी कारखाने आहेत. कल्याण, डोंबिवली अंबरनाथ, नवी मुंबई, ठाणे या शहरांमध्ये विस्तृत औद्योगिक क्षेत्र आहे. त्यामुळे तेथील उद्योग वसाहतींनजीकची लोकवस्ती वाढली आहे; पण तेथील औद्योगिक दुर्घटनांचा फटका थेट नागरी वस्तीला बसतो. त्यामुळे जिल्ह्यातील धोकादायक व प्रदूषणकारी कारखान्यांचे इतरत्र स्थलांतर करावे, अशी मागणी नागरिकांकडून केली जात आहे. पूर्वी मुंबईत कापड गिरण्या होत्या, तेव्हा तेथील प्रदूषणामुळे अनेक कामगारांचा बळी गेलेला आहे. आजही पुण्यासारख्या शहरात रस्त्यावरून जाताना धुराचे साम्राज्य असल्याचे लक्षात येते. वास्तविक, केंद्र सरकारने हवेच्या शुद्धीकरणासाठी अनेक महत्त्वाची पावले उचलली आहेत.

सौरऊर्जा, पवनऊर्जा यांना उत्तेजन, त्याचप्रमाणे इलेक्ट्रिक वाहनांना सवलती यांचा यासंदर्भात उल्लेख करावा लागेल, तरीही छाड, बांगला देश, पाकिस्तान आणि काँगो या देशांनंतर प्रदूषणाबाबत जगात भारताचा पाचवा क्रमांक असणे, हे भूषणावह नाही. शिवाय आसाममधील बर्निहाट आणि पंजाबमधील मुल्लानपूर ही छोटी शहरेही प्रदूषणग्रस्त आहेत, हे खूपच गंभीर आहे. गेल्या १० वर्षांत प्रदूषण देखरेख केंद्रांच्या संख्येत ३७ वरून १ हजारपर्यंत वाढ झाली आहे, तरीही देशाच्या गरजेच्या २५ टक्के यंत्रणा केंद्रेच आजवर स्थापण्यात आली आहेत. तसेच 'सेंटर फॉर सायन्स अँड एन्व्हायर्मेंट'च्या अभ्यासानुसार, भारतातील १२ टक्के शहरांच्याच हवेचा दर्जा तपासला जातो. सुमारे ६२ टक्के लोकसंख्या प्रदूषण देखरेख केंद्रांच्या कक्षेतच येत नाहीत. म्हणजे प्रथम ही यंत्रणा जास्तीत जास्त विस्तारण्याची गरज आहे. प्रदूषणाचा विकसित देशांप्रमाणे विकसनशील देशांवरही परिणाम होत असतो. तसेच प्रदूषण हा केवळ त्या त्या शहराचा प्रश्न असल्याचे मानले जाते. दिल्लीतील प्रदूषणास शेजारची राज्ये कारणीभूत असूनही एकत्रितपणे आणि सहकार्याने काम केले जात नाही. ग्रेटा थनबर्ग नावाच्या एका चिमुरडीने काही वर्षांपूर्वी जगातील बड्या देशांच्या नेत्यांना आपल्या विधायक आंदोलनाद्वारे पर्यावरणविषयक धोक्याचा इशारा दिला होता.

प्रगत देश कर्बोत्सर्जन कमी करण्यास तयार नाहीत, हे खरेच आहे; पण विकसनशील देशांमध्येही कर्बोत्सर्जनाबद्दलची जाणीव जागृती नाही. मुंबईतील मिठी नदी असो की कोल्हापूरची पंचगंगा, त्यांच्या पात्रांमधील प्रदूषणाच्या दुर्गंधीची लोकांना सवय झाली आहे. मुंबईत छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसकडून मध्य रेल्वेची गाडी सुटली की, सँडहर्स्ट रोड स्टेशनपर्यंत प्रवाशांना नाक मुठीत धरून बसावे लागते. मुंबई, ठाणे, कल्याण असे सर्वत्रच झोपडपट्ट्यांचे साम्राज्य असून, तेथे कमालीचा गलिच्छपणा असतो आणि बेकायदेशीर कारखाने सुरू असतात. मध्यंतरी 'लॅन्सेट प्लॅनेट हेल्थ'ने दिलेल्या अहवालातून धक्कादायक वास्तव समोर आले. भारतात वायू प्रदूषणामुळे वर्षाला ३३ हजार लोकांना जीव गमवावा लागत आहे. २००८ ते २०१९ या कालावधीत भारतात या प्रकारे ३६ लाख जण मृत्यू पावले. विशेष म्हणजे, देशातील हवेच्या गुणवत्तेच्या मर्यादेच्या खाली असलेल्या शहरांतही लोकांच्या प्रकृतीवर वाईट परिणाम झाल्याचे दिसून आले. कदाचित प्रदूषके मोजण्याची मानके असायला हवीत, त्यापेक्षा जास्त ठेवली असावीत, असे तज्ज्ञांचे मत आहे. भारतातील १० शहरे वायू प्रदूषणाच्या कचाट्यात सापडली असून, अहमदाबाद, बंगळूर, चेन्नई, दिल्ली, हैदराबाद, कोलकाता, मुंबई, पुणे, शिमला आणि वाराणसी या शहरांमध्ये दरवर्षी ३३ हजार व्यक्ती यामुळे मृत्यू पावत आहेत, असा निष्कर्ष 'लॅन्सेट'नेच काढला होता. या सर्वाची दखल घेऊन, केंद्र व राज्यांनी प्रदूषणाची पातळी घटवण्याचे निश्चित लक्ष्य नजरेसमोर ठेवून निर्धारपूर्वक वाटचाल केली पाहिजे.

# सार्वजनिक न्यास आणि अंदाजपत्रकांची औपचारिकता



काही कागद हे डाव्या बाजूने किंचित दुमडून, त्यांचा मध्यबिंदू काढून, त्याच्या दोन बाजूंना पंचिंग मशीनने छिद्रे पाडून नीट फाइलबंद होण्यासाठीच जणू जन्माला येतात. अशाच एका 'कागदा'ची (डॉक्युमेंटची) आणि त्याच्याशी संबंधित कायद्यातील काही वैशिष्ट्यपूर्ण तरतुदींची माहिती आपण या लेखात घेणार आहोत. (१) संबंधित कायदा:– या कायद्याचे नाव आहे महाराष्ट्र पब्लिक ट्रस्ट अ‍ॅक्ट. पूर्वी महाराष्ट्र ऐवजी बॉम्बे शब्द होता. तेव्हापासून 'बीपीटी अ‍ॅक्ट' हे त्याचे लोकप्रिय लघुनाम आहे. या कायद्याची अंमलबजावणी राज्य सरकारने करायची आहे. हा कायदा १९५० सालापासून अस्तित्वात आला आहे. म्हणजेच, हा ७५ वर्षे जुना झाला असल्याने तोही आता बदलायला झाला आहे, असे आपल्या सरकारला अचानक कळू शकते. (२) हा कायदा कोणत्या संस्थांना लागू आहे? :– आपल्या राज्यातील असंख्य धार्मिक संस्था आणि समाजोपयोगी कामे करणाऱ्या सार्वजनिक संस्था या कायद्याखाली नोंदीत असतात. पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट्स हे त्यांचे परिचित नाव. १८६० सालच्या सोसायटीज अ‍ॅक्टखाली नोंदीत झालेल्या संस्थासुद्धा या कायद्याखाली येतात. हे ट्रस्ट्स एकतर धार्मिक हेतूंसाठी असतात (उदा :– मठ, मंदिरे, धर्मशाळा, सर्वधर्मीय प्रार्थनास्थळे इत्यादी) किंवा निरनिराळ्या लोकोपयोगी कामांसाठी असतात ( उदा :– सार्वजनिक अशा शिक्षण संस्था, दवाखाने, रुग्णालये, रक्तपेढ्या, क्रीडासंस्था, वसतिगृहे, अनेक प्रकारचे सहाय्यता निधी, इत्यादी) (३) या सार्वजनिक ट्रस्ट्स (न्यास) साठी अंदाजपत्रकांची तरतूद :– उपरोक्त कायद्याच्या कलम ३१ ए आणि त्याखालील नियम १६ए प्रमाणे या संस्थांनी पुढील आर्थिक वर्षांसाठीची अंदाजपत्रके (बजेट्स) फेब्रुवारी अखेरपर्यंत नमुना सात–ए मध्ये, धर्मादाय आयुक्तांकडे सादर करावयाची असतात. वार्षिक उत्पन्न रुपये पाच हजारहून कमी असलेले धार्मिक हेतूंसाठीचे रीलिजियस ट्रस्ट्स आणि वार्षिक उत्पन्न दहा हजारहून कमी असलेले अन्य ट्रस्ट यांना यांतून सवलत दिली आहे. अनेक वर्षांपूर्वी ठरवलेल्या या रक्कम मर्यादा सद्या काळात खूपच कमी वाटतात. असो. येत्या हिशोब वर्ष २०२५–२६ साठीचे अंदाजपत्रक २८ फेब्रुवारी २०२५ पर्यंत सादर करणे अपेक्षित होते. पण ज्यांनी ते अजूनही केले नसेल त्यांना ते आता, विलंबाने का होईना, पण ३१ मार्चपूर्वी सादर करता येईल.

(४) अशी अंदाजपत्रके खरंच सादर केली जातात का?:– याचे उत्तर नाही आणि हो असे दोन्ही आहे. महाराष्ट्रात काही लाख संख्येत नोंदीत पब्लिक ट्रस्ट्स आहेत. त्यामध्ये काही ट्रस्ट्स जास्त करून कागदांवरच असलेले, तर काहींचे बव्हंशी/ सर्वच विश्वस्त खूप वयोवृद्ध असलेले किंवा मृत झालेले, काहींचे मूळ काम आता बव्हंशी बंद पडलेले, गेली काही वर्षे बऱ्याच सरकारी पूर्तता न केलेले, अशा निरनिराळ्या प्रकारचे ट्रस्ट्स आहेत. बाकी जे ट्रस्ट्स सर्वार्थाने कार्यरत आहेत त्यांतीलही सगळ्यांनाच ही तरतूद नेमकेपणाने माहीत असते आणि ती दरवर्षी लक्षातही राहते असे नाही. हे असे सगळे लक्षात घेता, एकूण नोंदीत ट्रस्ट्सपैकी काही ट्रस्ट्स ही अंदाजपत्रके सादर करत असतात. (५) त्या अंदाजपत्रकांचे पुढे काय होते :– ''त्यांचे बहुधा पुढे काहीही होत नाही'' हे याचे प्रत्यक्षातले उत्तर आहे. (उपरोक्त प्रश्न प्रस्तुत लेखकाने व या विषयाशी संबंध येणाऱ्या अजूनही काही सी.ए. आणि वकील मंडळींनी चॅरिटी कमिशनर ऑफिसमध्ये विचारला असता तिथेही हेच उत्तर मिळाले आहे.) म्हणजेच, अंदाजपत्रकापेक्षा खूपच जास्त खर्च झाला वा अंदाजपत्रकापेक्षा खूपच कमी उत्पन्न झाले, तर अशा फरकांबाबतचे स्पष्टीकरण वगैरे धर्मादाय आयुक्त कार्यालयाकडून सहसा कधी मागितले जात नाही. (६) असे अंदाजपत्रक सादर केले नाही वा विलंबाने सादर केले तर काय होते ?:– याचेही उत्तर ''विशेष काहीही होत नाही'' असेच आहे. फक्त ऑडिट रिपोर्टमधे त्यासंबंधी एक प्रश्न असतो (संस्थेने अंदाजपत्रक सादर केले आहे का?), त्याचे उत्तर हे अंदाजपत्रक सादरच केले गेले नसेल तर, नकारार्थी येते एवढेच. असे अंदाजपत्रक सादर न केल्याने कधी कुठल्या ट्रस्ट्सना जाब विचारला गेला आहे असे सहसा ऐकिवात येत नाही. त्यासंबंधी दंड लावता येईल अशी विशिष्ट तरतूद कायद्यात दिसत नाही. मात्र कलम ६७ मधील सरसकट तरतुदीखाली याबाबत रु. दहा हजार रुपयांपर्यंत दंड लागू शकतो. (७) मग अंदाजपत्रक सादर करावे ही तरतूद मुळात कशासाठी केली असावी? :– सार्वजनिक संस्था जनतेकडून निधी घेतात. त्यामुळे त्यांच्याही कामकाजात व्यावसायिकता यावी, चालू वर्षातील ११ महिने संपत आले असताना त्यात जो जमा–खर्च झाला आहे, त्या आधारावर त्यांनी पुढील पूर्ण वर्षासाठी जमा– खर्चविषयक काही नेमके अंदाज/संकल्प करावेत, योग्य आर्थिक नियोजन करत त्या संकल्पाप्रमाणे वाटचाल करावी, असा या तरतुदीमागील चांगला हेतू असावा. पुढील वर्षासाठी असे अंदाजपत्रक (किंबहुना अर्थसंकल्प) बनवल्याने, त्यांतून संस्थात्मक कामाला एक नेमकी दिशा मिळू शकते. (८) या कायद्यातील अन्य काही वैशिष्ट्यपूर्ण बाबी :–

(अ) ट्रस्ट्सची वार्षिक हिशोब पत्रके (आय व्यय पत्रक आणि ताळेबंद इत्यादी) तयार करणे आणि ते धर्मादाय आयुक्तांकडे सादर करणे ही जबाबदारीसुद्धा या कायद्याच्या कलम ३४ प्रमाणे, चक्क लेखा परीक्षकावर (ऑडिटर) सोपवली आहे. हे लेखापरीक्षणाच्या संबंधित मूळ तत्त्वांशी पूर्णत: विसंगत आहे. हिशोब पत्रके बनवायची संबंधित संस्थेने, व ती तटस्थपणे तपासायची लेखापरीक्षकाने, या सर्वसाधारण आणि जगन्मान्य संकेताला इथे कायद्यानेच अपवाद केला आहे. बहुधा ७५ वर्षांपूर्वी असलेल्या तत्कालीन परिस्थितीनुसार हे कलम लिहिले गेले असावे, ज्यांत आता मात्र बदल होणे आवश्यक आहे.

(ब) गेल्या काही वर्षांपासून ऑडिटरने नमुना ९– डीमधे एक तपशील सादर करावयाचा आहे. त्यात संबंधित ट्रस्टच्या सर्व विश्वस्तांची नावे आणि आयकराचे पॅन क्रमांक द्यावयाचे आहेत. तसेच संबंधित ट्रस्टने मागील तीन वर्षांची विवरणे धर्मादाय आयुक्तांकडे कधी सादर केली त्याचा तपशील द्यायचा आहे. ही तरतूद तुलनेत नवीन असून अजून अनेकांना माहीत झालेली नाही असे दिसते. (९) संबंधित कायदा आणि प्रशासन व्यवस्था :–

खरे तर हा कायदा, त्यातील काही कालबाह्य तरतुदी आणि धर्मादाय आयुक्त/सहआयुक्त यांच्या कार्यालयांतील परिस्थिती, तेथील अपुऱ्या / असमाधानकारक सोयी–सुविधा, तेथील कामकाजाच्या पद्धती, त्यांच्या ऑनलाइन कार्यप्रणालीत अनुभवास येणाऱ्या समस्या इत्यादी सगळ्यांचेच संपूर्ण पुनरावलोकन होणे आवश्यक वाटते आहे. काही वर्षांपूर्वी महाराष्ट्रातील निष्क्रिय ट्रस्ट्सचा धांडोळा घेऊन त्यांतील काहींची नोंदणी रद्द करण्याची मोहीम हाती घेतली होती. आता राज्य सरकारने उपरोक्त विषयांसाठीही एक सर्वंकष मोहीम हाती घ्यावी असे वाटते.

# होळी पौर्णिमेच्या मागील रहस्य! ।

होळी पौर्णिमा हा सण भारतात सर्वत्र मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो.विशेष करून महाराष्ट्राच्या कोकण भागात फार मोठ्या प्रमाणावर विविध पध्दतीने साजरा केला जातो.होळीच्या पौर्णिमेच्या सणाची थोडक्यात माहिती जाणून घेऊया होळी फाल्गुन महिन्यात येणारी पौर्णिमा ही होळी पौर्णिमा म्हणून ओळखली जाते. हिला हुताशनी पौर्णिमा असंही म्हणतात.होळी हा वाईटावर चांगल्याचा विजय आणि भगवान श्रीकृष्ण आणि राधा यांनी सामायिक केलेल्या स्वर्गीय प्रेमाचा उत्सव आहे. वंसत ऋतूचे आगमन आणि हिवाळ्याच्या समाप्तीचा सन्मान करण्यासाठी हा कापणी उत्सव म्हणून देखील साजरा केला जातो.हिन्दू पौराणिक कथांनुसार राधा ही अत्यंत गोरी होती.कृष्ण हा गडद रंगाचा होता.त्यांच्या त्वचेच्या वेगवेगळ्या टोनमुळे राधा आपल्याला स्विकारेल की नाही.याची चिंता कृष्णाला अनेक वेळा सतावत होती,असे. आणि त्याने आई यशोदा कडे तक्रार केली.यशोदाने एकदा गंमतीने सुचवले होते. कृष्णाने कोणतेही मतभेद लपविण्यासाठी राधाच्या चेहऱ्याला वेगळा रंग द्यावा.कृष्णाने आईच्या सल्ल्याप्रमाणे केले.आणि राधाच्या चेहऱ्यावर डाग लावण्यासाठी गुलालाचा वापर केला.आणि अशा प्रकारे होळीच्या उत्सवाला प्रारंभ झाला.

होळी या सणाची आणखी एक अख्यायिका आहे.राजा हिरण्यकश्यपू भगवान विष्णूचे अनुयायी असलेला त्यांचा मुलगा प्रल्हाद आणि त्याची मावशी होलिका या राक्षसाची कथा सांगते.भारतीय पौराणिक कथांनुसार हिरण्यकश्यपूला एक वरदान देण्यात आले होते.ज्या मुळे मनुष्य आणि प्राणी दोघांनाही त्याचा वध करण्यापासून रोखले गेले.म्हणुन त्याने त्यांना त्यांची पूजा करायला लावली.परंतू हिरण्यकश्यपूने आपली बहीण होलिकाला मुलगा भगवान विष्णूचा अनुयायी बनून त्याची पूजा करण्यास नकार दिल्यानंतर आगीपासून स्वतःचे रक्षण करण्यासाठी चितेवर बसून स्वतःला वस्त्राने झाकून आपल्या मुलाला ठार मारण्यास सांगितले. पण त्याचे रक्षण करण्यासाठी प्रल्हादाने भगवान विष्णूची प्रार्थना केली.त्यांनी होलिकाचे वस्त्र वाहून नेणारा वाऱ्याची झोत आपल्याकडे पाठवून प्रतिसाद दिला.म्हणून होळीच्या आदल्या दिवशी वाईटावर चांगल्याचा विजय झाल्याच्या निमित्ताने होळी उत्सव साजरा केला जातो.

कांही भागात घनदाट प्रमाणात जंगल आहेत.त्या भागातील सर्व गावकरी एकत्र येऊन जंगलात जातात मोठमोठी उंच झाडे तोडून वाजत गाजत गावकरी घेऊन येतात.होळी पौर्णिमेच्या दिवशी होळीला आंब्याची पाने बांधली जातात.नंतर मोठ्या दोरखंडाच्या सहायाने चारी दिशांना बांधून होळी उभी करतात.कांही भागात लहान मुलं टिमकी वाजवतात.सर्वच भागात एक सारख्याच पद्धती दिसून येत नाहीत.प्रत्येक भागात वेगवेगळ्या प्रकारच्या पध्दतीने पुजा अर्चा करीत असतात.नैवद्य दाखवताना होळीच्या अग्नीत पोळी टाकतात,तूप ही टाकतात.कांही भागात चोरुन लाकड गोवऱ्या जमा केली जातात.नंतर ती जाळतात.ज्या त्या भागातील रुढी पंरमपरेनुसार कृती केली जाते.पुर्वी समाज संपूर्ण अशिक्षित होता.फारशी शैक्षणिक किंवा वैज्ञानिक प्रगती झालेली नव्हती. दैविक शक्तीच्या किंवा दैववादी बनून अंधश्रद्धेच्या मानसिक अवस्थेत जीवन जगत होती.त्यामुळे त्या वेळच्या परिस्थितीला अनुसरून समाज वागत होता.आता आपण एक विसाव्या शतकात विज्ञान युगात जीवन जगत असतांना विवेकवादी विचारांनी प्रभावित होऊन बदलत्या परिस्थिती नुसार आपण आपल्या कालबाह्य झालेल्या रुढी परंपरेत बद्दल घडवून आणल्या पाहिजेत.आणि त्या आणण्यासाठी प्रत्येक सुज्ञ नागरिकांनी विचार केला पाहिजे.उत्सव साजरा करत असताना पर्यावरणाचे संतुलन राखण्यासाठी सर्व नागरिकांची जबाबदारी आहे.आणि ही काळाची गरज आहे.पुर्वी संतांनी प्रबोधनातून परिवर्तन घडवून आणण्याचा सातत्याने प्रयत्न केला आहे.

वृक्ष वल्ली आम्हा सोयरे.पृथ्वीवर जेवढे जिवंत प्राणी आहेत.ते सर्व हवेतील प्राणवायू शोषून घेऊन कार्बन डायॉक्साईड बाहेर सोडतात.आणि तो सोडलेला कार्बन डायॉक्साईड वायु निसर्गातील वनस्पती स्वतः शोषून घेऊन परत सजीवांच्यासाठी प्राणवायूचा पुरवठा सातत्याने करीत असतात.आणि ती अशुध्द हवा एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी वादळ वाऱ्याच्या सहायाने एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी वाहून नेण्याचे कार्य करीत असतात. निसर्ग जमिनीची धुप थांबवून संपूर्ण पर्यावरणाचे रक्षण करीत असतो.यांचा आपण एकाग्र होऊन विचार केला पाहिजे.पृथ्वीवरील प्राणवायू पाच मिनिटे बंद झाला.तर या पृथ्वीवर एक तर सजीव जीवंत राहिलं का? आणि आपल्या ३३ कोटी देवी देवतांच्या पैकी किती देव आपल्याला वाचवण्यासाठी प्राणवायूचा साठा उपलब्ध करून देतील! याचा गांभीर्याने विचार करुन वृक्षतोड थांबविण्यासाठी प्रयत्न करण्याची गरज आहे.याला पर्याय म्हणून गावातील सर्व तरुणांनी एकत्र येऊन गावांमध्ये स्वच्छता अभियान राबविण्यात यावे आणि संपूर्ण केरकचरा एकत्रित जमा करून जमा झालेल्या कचऱ्याची एकच होळी पेटवली जाऊन उत्सव साजरा केला जावा. म्हणजे संपूर्ण गाव स्वच्छ होऊन गावातील केर कचऱ्या पासून गाव स्वच्छ होईल.सामान्य जनतेला दुर्गंधी पासून आणि जीव जंतूंची निर्मिती पासून त्रास होणार नाही.गावात रोगराईला पसरणार नाही.वृक्ष तोड थांबविणे काळाची गरज आहे.



मुलांच्या हातात टिमक्या देवून आवाजाचे प्रदुषण करण्या ऐवजी मुलांचे भावी आयुष्य उज्वल घडविण्यासाठी किंवा त्यांच्या ज्ञानात भर टाकणारी छान,छान पुस्तके द्यावीत.यामुळे त्यांच्या ज्ञानात भर पडेल! आणि ज्येष्ठ नागरिकांना किंवा जन्माला आलेल्या लहान बालकांना,आजारी नागरिकांना होणारे आवाजाचे प्रदुषण थांबविण्यासाठी मदत होईल! होळी पुजेच्या वेळी नैवेद्य दाखवताना काही भागातील भाविक पोळी आणि तूप टाकतात.त्या भाविकांचे प्रबोधन करुन त्या पोळ्या तरुणांनी एकत्रित जमा करून. उपाशीपोटी गोरगरीबांच्या पोटाची भूक भागविण्यासाठी देवून सत्कार्य होईल.पुर्वी रंगपंचमीचा आंनद उत्सव साजरा करीत असताना नैसर्गिक रंगाचाच वापर केला जात होता.त्यामुळे कोणत्याही प्रकारची त्वचेला हानी पोहोचू शकत नव्हती.तसेच रंगपंचमी खेळताना आपापल्या मित्रपरिवारात खेळत आंनद लुटत होते.येणाऱ्या जाणाऱ्या नागरिकांना कोणत्याही प्रकारचा त्रास होणार नाही याची दक्षता घेतली जात होती.

सध्याची परिस्थिती पाहता रंगपंचमी खेळताना सर्वत्र नैसर्गिक रंगाच्या ऐवजी रासायनिक रंगांचा सरास वापर केला जात असल्याने त्वचेवर रंगाचे दुष्परिणाम होत असल्याचे दिसून येत आहेत.तसेच अनोळखी व्यक्तींना काही महत्त्वाच्या कामानिमित्त बाहेरगावी जावे लागते.तेंव्हा त्या रंगपंचमीचा प्रवाशांना हाकनाक त्रास होतो.तेंव्हा रंगपंचमीचा आंनद लुटत असताना इतरांना त्रास होणार नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे.कांही भागात रस्तावर मोठे लाकडी ओंडके टाकून किंवा दोरखंडाच्या सहा प्रत्येक गावात गांवात रस्ता आडवून सक्तीने पैसाची मागणी सक्तीने केली जाते.आणि जमलेल्या पैशातून काही भागात संध्याकाळी पार्टी केल्या जात असलेल्या दिसून येतात.पैसे दिले नाही दिल्यास रंग मारला जातो. तसेच येणाऱ्या जाणाऱ्या प्रवाशी वाहनांवर पिचकारिने किंवा रंगानी भरलेले फुगे फेकले जातात.त्यामुळे प्रवाशांना दुःखद प्रसंगी किंवा आजारी माणसाला दवाखान्यात जात असताना नाहक त्रास होत असतो.

रंगपंचमी खेळताना सर्वत्र नैसर्गिक रंगाचाच वापर सक्तीचा करणं आवश्यक आहे.कांहीं भागात विविध प्रकारची सोंग घेवून गावा गावात जाऊन करमणूक केली जाते.सदरचा कार्यक्रम सिमग्या पासून पाडव्याच्या संणापर्यंत चाललेला असतो.त्या मुळे ग्रामीण भागातील लहान मोठ्या कलाकारांना कला सादर करण्याची संधी उपलब्ध होत असते.त्यातून नवीन कलाकार घडतं असतात.अशा कार्यक्रमातून पर्यावरणाचे महत्त्व, वैज्ञानिक दृष्टीकोन, विवेकवादी याचे महत्त्व प्रामुख्याने पटवून देवून समाज प्रबोधन केले पाहिजे. कोणताही उत्सव साजरा करत असताना त्या मागील सत्य आणि असत्य यांची वैज्ञानिक दृष्टिकोनातून चिकित्सा केली पाहिजे.योग्य असेल ते स्वीकारावे.अयोग्य असेल ते सोडून द्यावे.

माणूस जीवनामध्ये नेहमी वैयक्तिक पातळीवर विवेकवादी होऊन चिकित्सा करत असल्याचे दिसून येतोय.ज्या वेळी तो बाजारामध्ये अत्यावश्यक वस्तू खरेदीसाठी जातो.त्यावेळी कोणत्याही वस्तूची खरेदी करताना महिला पुरुषांच्या पेक्षा जास्त चिकित्सक होऊन प्रत्येक वस्तूंची बारकाईने निरिक्षण करुन खरेदी करीत असतात. उदा.भाजीची पेंडी,धान्य,कपडे,भांडी,अगदी पारखून घेतल्या जातात.पण त्याच व्यक्ती जीवनातील कालबाह्य झालेल्या रुढी पंरमपरांचा वैचारिक कशोटीवर तपासून न घेता स्विकारण्याची त्यांची मानसिक अवस्था दिसून येते.या मुळे वैज्ञानिक दृष्टीकोनातून तपासून घेण्याची क्षमता नष्ट होवून अंधश्रद्धेचे बळी पडत आहेत.शास्त्रज्ञांनी अहोरात्र मेहनत घेऊन संशोधन करून तयार केलेली यंत्र सामुग्री, विविध उपकरणे,तंत्रज्ञान यांत्रिकीकरण टेक्नॉलॉजीचा.सर्वजण यथोचित उपयोग करून घेतात.अंधश्रध्देच्या बाजारातून विवेकवादी मार्गाने विज्ञानवादी मैदानात येऊन मुक्तछंद जगण्याची मानसिकता दिसत नाही. होळी पौर्णिमेच्या दिवशी होळी पेटविण्याचा मुख्य उद्देश हा आहे.की जीवनात माणूस म्हणून जगण्यासाठी जेवढ्या वाईट गोष्टी,वाईट कृत्य,वाईट विचार,अत्याचार,स्वैराचार, इत्यादी होळीच्या अग्नीत जाळून राख करायचं आणि चांगल्या गोष्टींचा स्वीकार करून माणूस म्हणून एकमेकांच्या बरोबर गुण्यागोविंदाने जगणं होय.परंतू दररोज सकाळ पासून संध्याकाळपर्यंत खुन,दरोडे,बलात्कार,अत्याचार,हाणामारी, भोसकाभोसकी,हे पाहून ३३ कोटी देवीदेवतांचे सानिध्यात राहून. राष्ट्रीय थोर समाजसुधारकांनी केलेल्या कार्यातून प्रेरणा घेऊन आदर्श व्यक्ती होण्याच्या ऐवजी राक्षसी प्रवृत्तीने प्रेरित होवून सैताना सारखा वागतो आहेस.तू जन्माला येताना भाडोत्री म्हणून पृथ्वीवर आला आहेस याची नेहमी माणूस म्हणून जाणीव ठेवावी!

**********

देशमुख पी.आर.
९९२११११९५५

# बुद्धगया महाबोधी बुद्धविहार मुक्ती आंदोलनास नवी मुंबईतील जनतेचा उत्स्फूर्तप्रतिसाद







नवी मुंबई / के. एच. हनवते :– भारतीय बौद्ध महासभा आणि वंचित बहुजन आघाडी नवी मुंबई जिल्हा यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक – १२ मार्च २०२५ रोजी विभागीय आयुक्त कोकण भवन, सि.बी.डी. बेलापुर नवी मुंबई येथे भव्य राज्यव्यापी आंदोलन करण्यात आले.

बिहारमधील गया येथे तथागत भगवान गौतम बुद्धांचे हजारो वर्षा पासुनचे महाबोधी बुद्ध विहार आहे. हे महाबोधी बुध्दविहार बौद्धांच्या अस्मितेचे केंद्र आहे. मात्र या महाबोधी बुद्ध विहाराचा ताबा बौध्देतर विशेषतः ब्राम्हणी धर्म पंडीतांकडे आहे. त्याचा जग भरातुन निषेध होत आहे. महाबोधी विहाराचे व्यवस्थापन हे बौद्ध अनुयायांच्या देखरेखीखाली कार्यान्वीत करावे अशी मागणी बौद्ध समाजा कडून करण्यात येत आहे. त्यासाठी बुद्धगया येथे जगातील बौद्ध भिक्खुंचे प्रतिनिधी आंदोलन करत आहेत. बुद्धगया येथील महाबोधी विहार परिसरात सुरु असलेल्या आंदोलनातील मागण्या मान्य करण्यासाठी तद्वतच बोधगया महाबोधी बुद्धविहारा संदर्भात बनवलेला १९४९ चा कायदा रद्द करून त्या ठिकाणाचे व्यवस्थापन हे बौद्धांकडे द्यावे. अशा प्रमुख मागण्यांचे निवेदन भारतीय बौद्ध महासभा व वंचित बहुजन आघाडी नवी मुंबई जिल्ह्याच्या वतीने नवी मुंबई विभागीय आयुक्त कोकण भवन, सि.बी.डी. बेलापुर नवी मुंबई यांना देण्यात आले. केंद्र शासनाचा धिक्कार असो..! महाबोधी विहार सन १९४९ चा कायदा रद्द करा..!! महाबोधी विहार बौद्धांच्या ताब्यात मिळालेच पाहीजे..!!! इत्यादी प्रकारच्या घोषणांनी कोकण भवन चा परिसर दणाणून गेला होता. महाबोधि विहारावर केलेल्या अतिरेकामुळे जन आक्रोश वाढला आहे. नवी मुंबई येथील या राज्यव्यापी आंदोलनाचे निवेदन देण्यासाठी व उपस्थितांना संबोधीत करण्यासाठी या आंदोलनामध्ये भारतीय बौद्ध महासभा महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष : यु.जी. बोराडे प्रामुख्याने उपस्थित होते. महाराष्ट्र राज्य महिला कमिटी अध्यक्ष : स्वातीताई शिंदे या दोन्ही महाराष्ट्राच्या वरिष्ठ पदाधिकाऱ्यांनी उपस्थितांना संबोधित केले. भारतीय बौद्ध महासभा नवी मुंबई जिल्ह्याचे माजी जिल्हाध्यक्ष – तद्वतच कोकण विभागाचे विद्यमान संघटक : जयवंत लव्हांडे गूरूजी यांनी आयुक्तांना दिलेल्या निवेदनाची (ओसी) सर्व उपस्थितांना वाचुन दाखविली. भारतीय बौद्ध महासभा नवी मुंबई जिल्ह्याचे अध्यक्ष : नामदेव जगताप आणि त्यांचे इतर सहकारी, नवी मुंबई महिला जिल्हाध्यक्ष : शोभाताई कांबळे आणि त्यांचे इतर सहकारी वंचित बहुजन आघाडी नवी मुंबई महिला जिल्हाध्यक्ष : शिल्पाताई रणदिवे, महीला महासचिव साक्षीताई लोटे आणि त्यांचे नवी मुंबई जिल्ह्यातुन आलेले इतर सहकारी, तसेच वंचित बहुजन आघाडी बेलापुर तालुका अध्यक्ष : सुनिल भोले आणि त्यांचे बेलापुर तालुक्यातील इतर सहकारी, ऐरोली तालुकाध्यक्ष : दिपक पहुरकर आणि त्यांचे सर्व सहकारी, ड. उमेश हातेकर, विक्रांत चिकणे, ज्ञानदिप निकाळजे, संजय झनके – अध्यक्ष भा.बौ. महासभा सिवुडस शाखा, अंकुश गायकवाड, राहुल शिरसाट, सतिश खंडाळे अध्यक्ष पंचशील बुद्धविहार तुर्भे स्टोअर्स शाखा, अशोक शेगांवकर, दिपक कांबळे, संतोष वाढवे, साक्षीताई लोटे वासनिक ताई, रेखाताई सावंत, प्रजावतीताई वाघमारे, बी.सी. सोनावले ( अध्यक्ष – जुईनगर शाखा ), देवानंद मनवर, बी.बी. खरात, कल्याणराव हणवते ( बौद्धाचार्य ), दत्तात्रय हराळ, ज्ञानदिप निकाळजे, छायाताई दिवे, प्रमिला जाधव, तमाम भारतीय बौद्ध महासभेचे पदाधिकारी, वार्ड शाखेचे पदाधिकारी, वंचित बहुजन आघाडीचे पदाधिकारी, वार्ड शाखेचे पदाधिकारी तमाम आंबेडकर चळवळीतील कार्यकर्ते, नवी मुंबई जिल्हा बटालियन चे सैनिक, उपासक व उपासिका जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहुन हे राज्यव्यापी आंदोलन यशस्वी केले. सर्व आंदोलनकर्त्यांचे भारतीय बौद्ध महासभा आणि वंचित बहुजन आघाडी नवी मुंबई जिल्हयाच्या वतीने जाहीर आभार..!

## स्वच्छता ही माझी जबाबदारी समजून कृतीशील व्हावे–डॉ.हनुमंत सौदागर



केज/प्रतिनिधी साने गुरुजी निवासी विद्यालय केज येथे गांधी तिर्थ स्वच्छता अभियान अंतर्गत स्वच्छतचे महत्त्व व स्वच्छता आरोग्या साठी किती आवश्यक आहे विषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शनासाठी व्याख्यान आयोजित करण्यात आले होते.या व्याख्यानाचे पुष्प गुंफताना प्राचार्य डॉ.हनुमंत सौदागर यांनी अस्वच्छता ही मानवनिर्मित घाण आहे तूज आहे तुजपाशी परी तु जागा चुकलाशी या उक्तीप्रमाणें स्वच्छतेची सुरुवात सर्वप्रथम स्वतहा पासून सुरू करायला पाहीजे भाषणे देऊन चालणार नाही या साठी आपण स्वतः कृती करायला पाहिजे.पृथ्वी निर्माण झाली त्यावेळेसच निसर्गातच सर्वांची निर्मिती झाली आहे. मानव,झाडे झुडपे,पशु पक्षी, प्राणी इत्यादीची निर्मिती झाली परंतु मनुष्याच्या गरजा जरा जास्तच वाढल्याने सुंदर स्वच्छ पृथ्वीवर माणसाने अस्वच्छता निर्माण करु लागला. हा देश माझा या देशाचे जरा से भान राहु द्या रे या प्रमाणे आपण स्वतः स्वच्छते विषयी जागरूक राहिले पाहिजे स्वच्छते मुळे रोगराई कमी प्रमाणात होते. अस्वच्छ असलेल्या भागात आजारपण व रोगराईचे प्रमाण आपण जास्त पाहतो या स्वच्छता ठेवा रोगराई मुक्त रहा हा संदेश आपण स्वतः पाळा व आपल्या परिसरातील नागरिक यांना सुद्धा स्वच्छते विषयीचे महत्त्व सांगितले पाहिजे. तरच भारत देश महासत्ता होईल असे मत व्यक्त केले.या प्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी साने गुरुजी निवासी प्रा.उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्राचार्या डॉ. कविताताई कराड मॅडम या उपस्थित होते.

## मूत्रपिंडाच्या आजारापासून बचाव करण्यासाठी ५ महत्त्वाच्या टिप्स

भारतातील लाखो लोक मूत्रपिंडाच्या आजाराने पिडीत आहेत. आपल्या शरीरातील कचरा मूत्राद्वारे शरीराच्या बाहेर फेकणे हे याचं मुख्य कार्य असतं. मूत्रपिंड रक्तामध्ये आढळणारे टाकाऊ पदार्थ, शरीरासाठी अनावश्यक असलेले अतिरिक्त खनिजे लघवीवाटे बाहेर काढून टाकते आणि शुद्ध रक्त संपूर्ण शरीरात वितरीत करते. जेव्हा मूत्रपिंडाचे कार्य कमी होते तेव्हा शरीरात हानिकारक विषारी पदार्थ तयार होतात, ज्यामुळे मूत्रपिंड निकामी होण्याच्या गंभीर गुंतागुंत वाढू लागतात.

मूत्रपिंडाचा आजार हा मधुमेह, उच्च रक्तदाब, अनुवांशिकता, संसर्ग अशा विविध कारणांमुळे होऊ शकतो. यासाठी वेळीच निदान करणे गरजेचे आहे, कारण सुरुवातील बऱ्याचदा मूत्रपिंडाच्या आजाराची लक्षणे दिसून येत नाही. सामान्य लक्षणांमध्ये पाय किंवा चेहऱ्यावर सूज येणे, लघवीवाटे रक्त येणे, थकवा येणे, मळमळ आणि रक्तदाब कमी– जास्त होणे यांचा समावेश आहे. मात्र ही लक्षणे दिसताच घाबरून जाऊ नका कारण निरोगी जीवनशैलीचा अवलंब करून मूत्रपिंडाचा आजार अनेकदा रोखता येतो. वेळीच निदान केल्याने आजाराची प्रगती कमी होते आणि जीवनमान सुधारण्यास मदत होते. डॉ. अमर कुलकर्णी, नेफ्रोलॉजिस्ट, मेडिकवर हॉस्पिटल्स, खारघर, नवी मुंबई यांनी याबाबत अधिक माहिती दिली आहे. तुमच्या मूत्रपिंडास निरोगी ठेवण्यासाठी आणि मूत्रपिंडाच्या आजारापासून बचाव करण्यासाठी याठिकाणी पाच टिप्स देण्यात आल्या आहेत त्याचे तुम्ही पालन करा. तज्ज्ञांनी केलेल्या विविध अभ्यासांनुसार, योग्य हायड्रेशन मूत्रपिंडातील कचरा फिल्टर करण्यास आणि मूत्रपिंडातील खडे ओळखण्यास मदत करते. दिवसातून सुमारे १० ते १२ ग्लास पाणी प्यायल्याने शरीरातील विषारी पदार्थ बाहेर काढून टाकण्यास मदत होते. मात्र गरजेपेक्षा जास्त पाणी पिणे टाळले पाहिजे, विशेषतः मूत्रपिंडासंबंधीच समस्या असलेल्या व्यक्तींनी ओव्हरहायड्रेशन टाळा.

## बोराडे शास्त्रींनी त्यागाच्या बळावर माळरानावर भक्तीचा मळा फुलविला:– योगी निरंजननाथ महाराज




केज/प्रतिनिधी तालुक्यातील श्रीक्षेत्र संत तुकोबाराय पावनधाम संस्थान येथे संत तुकाराम महाराज बीजोत्सवाच्या सोहळ्यात तिसऱ्या दिवशी ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी आळंदीचे प्रमुख विश्वस्त,योगी निरंजननाथ महाराज यांची प्रवचन सेवा संपन्न झाली.यावेळी उपस्थित भाविकांना ज्ञानामृत वाटताना योगी निरंजननाथ महाराज म्हणाले की,बोराडे शास्त्रींनी त्यागाच्या बळावर देहूचे तुकोबा माळरानावर आणून भक्तीचा मळा फुलविला आहे. प्रवचनात पुढे बोलताना ते म्हणाले की, समाधान,सुख हे फक्त पांडुरंगाच्या भक्तीत आहे. माऊलींनी दिलेला 'रामकृष्ण हरी' हा मंत्र जपत रहा, आयुष्यात कांही कमी पडणार नाही.ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटी आळंदीचे प्रमुख विश्वस्त,योगी निरंजनाथ महाराज यांचे प्रवचन ऐकण्यासाठी शेकडो भाविक संत तुकोबाराय पावनधाम संस्थान येथे आले होते.आलेल्या भाविकांची गैरसोय होणार नाही याची काळजी संत तुकोबाराय पावनधाम संस्थानचे संस्थापक अध्यक्ष ह.भ.प.महादेव महाराज बोराडे शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली स्वयंसेवकांनी घेतली.

## : सांधेदुखी आणि मधुमेहापासून आराम मिळवण्यासाठी जेवल्यानंतर 'हा' पदार्थ खा चावून, उद्भवणार नाहीत गंभीर आजार





स्वयंपाक घरात सर्वच प्रकारचे मसाले उपलब्ध असतात. या मसाल्यांचा वापर चहा किंवा इतर पदार्थ बनवण्यासाठी केला जातो. भारतातील मसाले जगभरात सगळीकडे प्रसिद्ध आहेत. या मसाल्यांची चव, रंग आणि सुगंध अतिशय सुंदर असल्यामुळे जेवण बनवताना वापर केला जातो. मसाल्यातील पदार्थांमध्ये प्रामुख्याने वापरला जाणारा मसाला म्हणजे लवंग. लवंगचा वापर आरोग्यासंबंधित समस्यांपासून आराम मिळवून देण्यासाठी सुद्धा केला जातो. लवंगचे सेवन केल्यामुळे दातांचे दुखणे थांबते. आयुर्वेदामध्ये लवंगला विशेष महत्व आहे. सर्दी किंवा खोकला झाल्यानंतर मसाल्यांचा वापर करून काढा तयार केला जातो. आज आम्ही तुम्हाला लवंग चावून खाल्यामुळे आरोग्याला नेमके काय फायदे होतात, याबद्दल सविस्तर माहिती सांगणार आहोत.

लवंग खाल्याने शरीराला होणारे फायदे:

पचनक्रिया सुधारते:

जंक फूड किंवा तिखट तेलकट पदार्थांचे अतिसेवन केल्यामुळे शरीराची पचनक्रिया बिघडते. पचनक्रिया बिघडल्यानंतर आरोग्याला हानी पोहचण्याची शक्यता असते. त्यामुळे अपचनाची समस्या दूर करण्यासाठी लवंग खावी. यामध्ये अँटीऑक्सिडंट आणि अँटी–इंफ्लेमेटरी गुणधर्म आढळून येतात. लवंग खाल्यामुळे अपचन, गॅस, बद्धकोष्ठता इत्यादी अनेक समस्यांपासून आराम मिळतो.लवंग खाल्यामुळे पोटात होणारी जळजळ कमी होऊन आतड्यांचे कार्य सुधारते. याशिवाय शरीरात साचून राहिलेले विषारी घटक बाहेर पडून जातात.

दातांसाठी फायदेशीर:

दात दुखी, हिरड्यांमधील वेदना, दातांवर पिवळा थर साचून राहणे, कीड लागणे इत्यादी अनेक समस्यांपासून लवंगचे सेवन करावे. याशिवाय दातांमध्ये कीड लागल्यास लवंग रात्रभर दातांमध्ये ठेवावी. यामुळे कीड नष्ट होऊन दात स्वच्छ होईल. नैसर्गिक अँटीसेप्टिक आणि वेदनाशामक म्हणून लवंग दातांसाठी प्रभावी ठरते. लवंग तेलाचा वापर करून तोंडातील बॅक्टेरिया नष्ट होतात. याशिवाय लवंग तेल माउथवॉश म्हणून सुद्धा वापरले जाते.

रोगप्रतिकारशक्ती सुधारते:

साथीचे आजार किंवा सर्दी, खोकला झाल्यानंतर लवंगचा काढा प्यावा. लवंगचा काढा प्यायल्यामुळे शरीराची रोगप्रतिकारशक्ती सुधारते आणि आरोग्याला अनेक फायदे होतात. यामध्ये असलेले अँटीऑक्सिडंट आणि जीवनसत्त्वे शरीराची रोगप्रतिकारशक्ती सुधारतात आणि साथीच्या आजारांपासून शरीराचे नुकसान होऊ देत नाहीत.

सांधेदुखीपासून सुटका:

नैसर्गिक वेदनाशमक म्हणून लवंग तेलाचा वापर केला जातो. यामध्ये असलेले गुणधर्म सांध्यांमधील सूज आणि जळजळ कमी करण्यासाठी मदत करतात. याशिवाय थकवा आणि अंगदुखीपासून सुद्धा आराम मिळतो. लवंग तेल शरीराला लावल्यामुळे रक्तभिसरण सुधारण्यास मदत होते. अंघोळीच्या पाण्यात थेंबभर लवंग तेल टाकून मिक्स करून अंघोळ केल्यास शरीराचा थकवा कमी होईल.

## ऑफिसच्या डब्यासाठी 'या' पद्धतीने बनवा चमचमीत भेंडी फ्राय, लहान मुलं आवडीने खातील भाजी





लहान मुलांसह मोठ्यांच्या डब्यासाठी नेमी नेहमी काय भाजी बनवावी? हे अनेकदा सुचत नाही. भेंडीच्या भाजीचे नाव ऐकल्यानंतर मुलं आणि घरातील मोठे व्यक्ती नाक मुरडतात. भेंडीची भाजी अनेकांना खायला आवडत नाही. पण भेंडीची भाजी खाणे आरोग्यासाठी अतिशय पौष्टिक आहे. भेंडीच्या भाजीसोबत तुम्ही चपाती, भाकरी किंवा भात खाऊ शकता. आज आम्ही तुम्हाला सोप्या पद्धतीमध्ये भेंडी फ्राय बनवण्याची रेसिपी सांगणार आहोत. या पद्धतीमध्ये भेंडीची भाजी बनवल्यास चव अतिशय सुंदर लागेल. तुम्ही बनवलेल्या भाजीचे सगळेच कौतुक करतील. त्यामुळे सकाळच्या डब्यासाठी भेंडी फ्राय बनवू शकता. दुपारच्या जेवणात काम करून भूक लागल्यानंतर काहींना काही चमचमीत पदार्थ खाण्याची इच्छा होते. अशावेळी भेंडी फ्राय हा पर्याय अतिशय उत्तम आहे.

साहित्य: भेंडी लाल तिखट मीठ मैदा कॉर्न फ्लॉवर बेकिंग पावडर लसूण पेस्ट टोमॅटो सॉस चिली फ्लेक्स पाणी मध तीळ
कोरियन मिरची पेस्ट

कृती: भेंडी मसाला बनवण्यासाठी सर्वप्रथम, भेंडी पाण्याने स्वच्छ धुवून घ्या. त्यानंतर उभी चिरून घ्या.

वाटीमध्ये मैदा,बेकिंग पावडर, कॉर्न फ्लॉवर टाकून मिक्स करा. त्यानंतर त्यात चवीनुसार मीठ, लाल तिखट हे सर्व पदार्थ मिक्स करून त्यात आवश्यकतेनुसार पाणी घालून जाडसर पीठ बनवा.

चिरून घेतलेल्या भेंडीला तयार केलेले पीठ लावून गरम तेलात भेंडी फ्राय करा. भेंडी फ्राय करताना जास्त लाल करू नये.

कढईमध्ये तेल गरम करून त्यात लसूण, कोरियन पेस्ट, टोमॅटो सॉस, चिली फ्लेक्स, पांढरे तीळ घालून नंतर फ्राय करून घेतलेली भेंडी टाकून मिक्स करा.

सगळ्यात शेवटी वरून मध टाकून मिक्स करा. तयार आहे सोप्या पद्धतीमध्ये तयार आहे भेंडी मसाला.

## सूर्यास्त होताच तुम्हालाही अस्वस्थ वाटू लागतं? तज्ज्ञ काय सांगतात

निसर्गाच्या सौंदर्याची किमया अगाध आहे. सकाळचा सुंदर सूर्योदय ते संध्याकाळचा शांत सूर्यास्त आणि रात्रीच्या अंधारातील चंद्र, चांदण्या न्याहाळण्याचा आनंद अनेकांसाठी लाखमोलाचा असतो. त्यातच संध्याकाळ म्हटलं की, अनेक निसर्गप्रेमी अस्ताला जाणाऱ्या सूर्याला पाहण्याचा सुंदर क्षण आपल्या डोळ्यांमध्ये साठवून ठेवतात. पण, तुम्हाला ठाऊक आहे का? हीच संध्याकाळ अनेकांना अस्वस्थ करते. याला 'सूर्यास्ताची चिंता', असेही म्हणतात. त्यांना सूर्य क्षितिजाच्या खाली मावळताना अस्वस्थता, दुःख किंवा भीतीची भावना जाणवू लागते.

ही गोष्ट ऐकायला आणि वाचायला सामान्य वाटत असली तरी ती पूर्णपणे सामान्य बाब सूर्यास्ताच्या वेळी अनेक व्यक्तींना अचानक अस्वस्थ का वाटते? सूर्यास्ताची चिंता का असते आणि ती हंगामी भावनिक विकार (एसएडी)पेक्षा वेगळी आहे? परवानाधारक पुनर्वसन सल्लागार व मानसोपचार तज्ज्ञ सोनल खंगरोत स्पष्ट करतात की, 'सूर्यास्ताची चिंता' ही एक गैर–क्लिनिकल संज्ञा आहे, जी सूर्यास्त होताना येणाऱ्या चिंतेला सूचित करते. त्यामुळे पश्चात्ताप, अस्वस्थता, पोकळी किंवा अपूर्णतेच्या भावना जाणवते.

खरं तर माणसाच्या आयुष्यातील सामान्य चिंतेच्या विपरीत, जी सततच्या ताणतणावांशी किंवा मानसिक आरोग्य विकारांशी संबंधित असते, सूर्यास्ताची चिंता ही दिवसापासून रात्रीपर्यंतच्या दैनंदिन संक्रमणाशी संबंधित असते. खंगरोत याबाबत, ही बाब हंगामी भावनिक विकार (एसएडी)पासून वेगळी आहे, जी हिवाळ्यात दिवसाच्या कमी प्रकाशात जाणवते.

# तालुक्यात अनेक ठिकाणी विहिरींची कामे ठप्प? सिंचनाचे स्वप्न धूसर बिरसा मुंडा कृषी योजना





किनवट: शेख शौकत :-तालुक्यात अनुदानाची रक्कम प्राप्त न झाल्याने अनुसूचित जमातीच्या लाभार्थी शेतकऱ्यांचे कृषी सिंचनाचे स्वप्न स्वप्नच राहिले किनवट तालुक्यातील बिरसा मुंडा कृषी क्रांती योजनेंतर्गत तालुक्यात २०२४-२५ या वर्षात कमी जास्त ९७ सिंचन विहिरी मंजूर असल्या, तरी निधीच उपलब्ध झाला नसल्याने कामे ठप्प झाली आहेत. नव्या आर्थिक वर्षाला सुरुवात होण्याला कमी जास्त २० दिवस उरले आहेत. तर उन्हाळा सुरू झाल्यामुळे विहिरींचे काम करण्याला संधी आहे. पण, निधीच नसल्याने खोदकाम बांधकामाला अद्यापही सुरुवात झाली नसल्याचे चित्र आहे. अनुसूचित जमाती प्रवर्गाच्या शेतकऱ्यांची शेती ओलिताखाली यावी, त्यांचे उत्पन्न वाढवून जीवनमान उंचावणे, त्यांचा कृषी विकास व्हावा, या हेतूने बिरसा मुंडा कृषी क्रांती योजना कार्यान्वित आहे. २०२४-२५ या वर्षात किनवट पंचायत समितीच्या अंतर्गत येणाऱ्या अनेक आदिवासी गावांतील शेतकऱ्यांना लाभ देण्यासाठी प्रथम अर्ज मागवले. त्यानंतर कमी जास्त ९७ लाभार्थ्यांची निवड करण्यात आली. वर्ष संपायला आले, तरी अनुदानाचा निधीच उपलब्ध झाला नसल्याने तालुक्यातील वयक्तिक लाभाच्या विहिरींची कामे ठप्प झाली तरी आदिवासी शेतकऱ्यांमध्ये नाराजगी दिसून येत आहे. शेती ओलिताखाली आणण्याचे लाभार्थ्यांचे स्वप्न सध्यातरी धूसर झाले आहे. शासनाने विहिरीच्या अनुदानात वाढ केली आहे. आता एका विहिरीला कमी जास्त ४ लाख रुपयांचे अनुदान शासन देते, पण अनुदानाच्या निधी अभावी विहीर खोदकाम, बांधकाम ही कामे अजूनही लाभार्थ्यांनी सुरूच केली नाहीत. काम सुरू करावे का, म्हणून लाभार्थी पंचायत समितीच्या कृषी विभागात खेटे मारत आहेत. हे आर्थिक वर्षे संपून नवे २०२५-२६ हे आर्थिक वर्षे तोंडावर आले आहे. असे असतानाही निधी उपलब्ध नसल्याने लाभार्थी अनुदानाच्या प्रतीक्षेत आहेत. अनेक लाभार्थ्यांचे बिले रखडली? याच योजने अंतर्गत २०२३-२४ या वर्षातील २५ ते ३० लाभार्थ्यांनी डिसेंबर २०२४ ते जानेवारी २०२५ या कालावधीत कामे करून बिले सबमिट केली. पण, त्याचेही अनुदान रेंगाळले आहे. उल्लेखनीय म्हणजे या विहिरीला अडीच लाख रुपयांचे अनुदान आहे.

# सकारात्मक मानसिकतेने जग जिंकणे शक्य




मुरुड/ महेंद्र आल्टे : सकारात्मक मानसिकतेतून आपण सर्व प्रकारच्या व्यसनातून मुक्त होऊ शकतो. मुलींच्या हस्तक्षेपाशिवाय आपला देश व्यसनमुक्त होणार नाही. मनावर ताबा ठेवून चांगले विचार आत्मसात केल्यानंतर व्यसनावर मात करता येते, असे प्रतिपादन डॉ. अनिता राठोड यांनी मानसिक स्वास्थ्य आणि तम्बाखुचे दुष्परिणाम या विषयावर मार्गदर्शन करताना केले.

वैद्यकीय अधीक्षक राज गलांडे यांच्या मार्गर्शनाखाली मुरुड येथील संभाजी महाविद्यालयात आयक्यूएसी आणि सावित्रीबाई फुले युवती मंचाच्या वतीने घेण्यात आलेल्या कार्यक्रमात त्या बोलत होत्या.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक काळम होते. विचारमंचावर प्रा.सौ. कदम एम. एस. , प्रा. गायकवाड एम.बी. यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना त्यांनी असे सांगितले की, महिलांच्या सहभागातून जनजागृती करून आपण पुरुषांना व्यसनापासून परावृत्त करू शकतो. समाज आणि राष्ट्राचा विकास करण्यासाठी व्यसनमुक्ती आवश्यक आहे. म्हणून स्त्रियांना त्यांच्या कुटुंबातील पुरुषांची व्यसनाधीनता सोडवता येईल.

अध्यक्षीय समारोप महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक काळम यांनी केला. ध्येयप्राप्ती आणि यशप्राप्ती करावयाची असेल तर व्यसनापासून दूर राहण्याचा मौलिक संदेश विद्यार्थ्यांना प्राचार्य डॉ. काळम यांनी दिला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक आणि पाहुण्यांचा परिचय आयक्यूएसी समन्वयक प्रा. गायकवाड एम. बी. यांनी करून दिला. यावेळी कार्यक्रमाचे आभार प्रा. डॉ. सौ. कदम एम. एस. यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी प्रा. डॉ जाधव जी.एल. आणि प्रा. मेहराज तांबोळी यांनी परिश्रम घेतले कार्यक्रमास प्राध्यापकांसह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# प्रिंट मिडीयाला मरण नाही;ग्रंथालय कर्मचार्यांचे प्रश्न मान्य करुन घेण्यास कटिबध्द जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय वार्षिक अधिवेशन उद्घाटनप्रसंगी आ.अभिमन्यु पवार यांची ग्वाही

लातूर :- मी गतवर्षीच मुक्तेश्वरांच्या साक्षीने राज्यातील सार्वजनिक ग्रंथालयांचे पालकत्व स्विकारले आहे,म्हणून उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांतदादा पाटील यांच्या नेतृत्वात सार्वजनिक ग्रंथालयांना चाळीस टक्के अनुदान वाढ,दर्जा बदल आणि नवीन ग्रंथालय मान्यता मिळण्याच्या दृष्टिने दोन बैठका लावल्या आहेत असे सांगून,आज सोशल मिडीया कितीही प्रभावी दिसत असला तरी प्रिंट मिडीयाला मरण नाही,पुस्तक म्हणजे विचार आहेत,ते जतन करण्याचे,घराघराघरात पोहाचेविण्याचे मोलाचे काम सार्वजनिक ग्रंथालये करत आहेत,त्यात काम करणारे ग्रंथालय कर्मचार्यांच्या वेतनश्रेणीचा मार्गी लावून घेण्यासाठी आपण सदैव कटिबध्द असल्याची ग्वाही आ.अभिमन्यु पवार यांनी येथे दिली. लातूर जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघ आणि नागाबुवा वाचनालय,हेळंब यांच्या संयुक्त विद्यमाने,लातूर जिल्हा सार्वजनिक ग्रंथालय संघाचे ४० वे वार्षिक अधिवेशन गुरुवार,दि.१३ मार्च २०२५ रोजी कातळे नगरातील नंदादिप माध्यमिक विद्यालयात पार पडले,त्याच्या उद्घाटनप्रसंगी उद्घाटक म्हणून आ.पवार बोलत होते.या सत्राच्या अध्यक्षपदी महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष प्रा.डॉ.गजानन कोटेवार हे हे होते.माजी जिल्हा परिषद अध्यक्ष पंडितराव धुमाळ हे विशेष अतिथी होते तर मंचावर प्रमुख पाहुणे म्हणून थोर विचारवंत डॉ.सोमनाथ रोडे,मराठवाडा विभागाचे सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे,जिल्हा ग्रंथालय अधिकारी वंदना काटकर देशमुख,राज्य ग्रंथालय संघाचे माजी अध्यक्ष डॉ.रामेश्वर पवार, राज्य ग्रंथालय संघाचे कार्याध्यक्ष गुलाबराव पाटील, मराठवाडा ग्रंथालय संघाचे अध्यक्ष खंडेराव सरनाईक, कार्याध्यक्ष प्रभाकर कापसे,बीड जिल्हाध्यक्ष सुधीर चाटे,लातूर जिल्हा कार्याध्यक्ष डॉ.ब्रिजमोहन झंवर, हेळंबच्या सरपंच अयोध्या सिरसे, नागाबुवा मठाचे अध्यक्ष विठ्ठलराव पाटील,पाखरसांगवीचे सरपंच भिमाशंकर लखादिवे यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलतान आ.पवार म्हणाले की,गाव तिथे ग्रंथालय ही शासनाची भूमिका आहे,ती माझीही आहे,सध्या शासनाची आर्थिक स्थिती बेताची असली तरी सार्वजनिक ग्रंथालयांच्या प्रश्नांसदर्भात शासन सकारात्मक आहे,ग्रंथालय संघाचे राज्याध्यक्ष डॉ.कोटेवार यांची ग्रंथालयाच्या प्रश्नांप्रतीची भूमिका,तळमळीची व रास्त आहे,महापुरुषांनाही संघर्ष केलाच,वाचन केल्याशिवाय ज्ञान मिळणार नाही,म्हणून एमपीएस्सीचीही परीक्षा पध्दतीही डिस्क्रीप्टीव्ह करण्यात आली,त्यामुळे अभ्यासू अधिकारी मिळतील. प्राथमिक शिक्षण दर्जेदार झाले पाहिजे यावर आपला भर असून, मतदार संघातील सार्वजनिक ग्रंथालयांना निधी देवू,सार्वजनिक ग्रंथालयांचे आणि कर्मचार्यांच्या प्रश्नासाठी आपण योग्य वेळी,योग्य ठिकाणी सार्वजनिक ग्रंथालय संघाच्या खांद्याला खांदा लावून काम करु,कर्मचार्यांच्या वेतनश्रेणीबाबतचा योग्य प्रस्ताव द्या राज्याचे मुख्यमंत्री,अर्थमंत्री व उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांची भेट घेवून यात मार्ग काढू अशीही ग्वाही आ.पवार यांनी यावेळी दिली. अध्यक्षीय समारोपात डॉ.गजानन कोटेवार यांनी सार्वजनिक ग्रंथालयांचे अनुदान वाढ,दर्जा बदल,नवीन ग्रंथालयांना मान्यता याबरोबरच ग्रंथालय कर्मचार्यांच्या प्रश्नांवर प्रकाश टाकून ग्रंथालय चळवळीला आ.अभिमन्यु पवार यांच्यामुळे न्याय मिळेल असा विश्वास व्यक्त केला. सहाय्यक ग्रंथालय संचालक सुनील हुसे यांनी आ.अभिमन्यु पवार यांच्यामुळे ग्रंथालय चळवळीला नवजीवन मिळाल्याचे सांगितले, जिल्हा ग्रंथालय अधिकारी वंदना काटकर यांनी पुणे येथील ग्रंथमेळ्यामध्ये प्रचंड ग्रंथ खरेदी झाल्याने वाचन संस्कृती विस्तारत असल्याचे नमुद केले.




या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे राज्य कार्योपाध्यक्ष राम मेकले यांनी केले.तर साने गुरुजी शैक्षणिक संकुलाचे प्रमुख कालिदास माने यांनी स्वागतर भाषणात लोकनेते विलासरावानंतर आ.पवार यांच्या रुपाने सर्वसमावेशक,अभिमान वाटावा असा विशाल मनाचा नेता मिळाल्याचे सांगून ग्रंथालये आणि कर्मचार्यांना ते न्याय मिळवून देतील अशी अपेक्षा व्यक्त केली. प्रारंभी डॉ.एस.आर.रंगनाथन् यांच्या प्रतिमेचे पूजन आणि दिपप्रज्वलनाने कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.याप्रसंगी आ.अभिमन्यू पवार यांची ग्रंथतुला करण्यात येवून ते ग्रंथ जिल्हा परिषद शाळांना भेट देण्याचे जाहीर करण्यात आले. सर्व मान्यवरांचे शाल,स्मृतीचिन्ह,तुळशीचे रोपटे देवून स्वागत करण्यात आले.या प्रसंगी जिल्हा ग्रंथालय संघाचा कै.त्र्यंबकदास झंवर (काका)राज्यस्तरीय आदर्श ग्रंथालय कार्यकर्ता पुरस्कार (११ हजार रुपये रोख,शाल,स्मृतीचिन्ह,ग्रंथ) कुंडलिक मोरे यांना, कै.मारुती चिरके आदर्श ग्रंथपाल पुरस्कार (अडीच हजार रुपये,शाल,स्मृतीचिन्ह,ग्रंथ) पुरस्कार प्रकाश सोनकांबळे यांना तसेच राज्य शासनाचा ग्रंथमित्र पुरस्कार विजेते युवराज जाधव यांचा व नागाबुवा वाचनालय हेरंब पुरस्कार ऍड.शशिकिरण पाटील यांना आ.पवार यांच्या हस्ते सन्मानीत करण्यात आले जिल्हा या सत्राचे सूत्रसंचालन पी.सी.पाटील व प्रा.सतीष हानेगावे यांनी केले. या वार्षिक अधिवेशनाच्या निमित्ताने सकाळी ९ ते १० वाजेच्या दरम्यान अवंतीनगरातील सानेगुरुजी विद्यालय ते कातळे नगरातील नंदादिप शाळेपर्यंत शालेय विद्यार्थी,बंजारा महिला,वारकरी महिला,ग्रंथालय चालक,कर्मचारी,साने गुरुजी संकुलातील कर्मचारी,नागाबुवा वाचनालयाचे पदाधिकारी,ढोल ताशा,हालगी वादकांच्या सहभागाने विशाल ग्रंथ दिंडी काढण्यात आली,आरंभी पंडितराव धुमाळ व कालिदास माने यांच्या हस्ते ग्रंथदिंडीचे पूजन करण्यात आले. धर्मादाय सह आयुक्त आ.ए.सासणे यांच्या अध्यतेखाली महाराष्ट्र विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चा कायदा व विश्वस्त बदल अर्ज आणि इतर माहिती मार्गदर्शन या विषयावर झालेल्या दुसर्या चर्चासत्रात धर्मादाय उपायुक्त एस.व्ही.एच.कादरी यांनी अतिशय सोप्या भाषेत विश्वत कायदा व अर्ज बदल याविषची अवगत केले.या सत्राचे प्रास्ताविक जिल्हा ग्रंथालय अध्यक्ष प्रभाकर कापसे यांनी केले,कार्याध्यक्ष राम मेकले यंनी आभार मानले.या कार्यक्रमासाठी साने गुरुजी संकुलाचे प्रमुख कालिदास माने,कोषाध्यक्ष सुरेखा माने,प्राचार्य विवेक माने,महादेव खिचडे,नागाबुवा वाचनालयाचे पदाधिकारी,जिल्हा ग्रंथालय संघाचे हागवीराव बेरकीळे,काशिनाथ बोडके,बाळकृष्ण होळीकर,किरण बाबळसुरे,अशोक खोडवे,सिरसे,घोगरे,राजकुमार सोनी,गुप्तलिंग स्वामी,अजित पाटील,गोकर्णा सुर्यवंशी,बाळ होळीकर,राम मोतीपवळे,सुशील मेकले,गिरीधर जंगाले,नागनाथ बिरादार,मुख्याध्यापिका उषा आडे आदींनी सहकार्य केले. अधिवेशनाला मोठ्या संख्येने ग्रंथालय चालक व कर्मचारी,शिक्षक,विद्यार्थी उपस्थित होते.

# नोकर भरतीसाठी महाबँक कर्मचाऱ्यांचे देशभरात क्षेत्रिय कार्यालयासमोर धरणे आंदोलन संपन्न

बँक ऑफ महाराष्ट्र मधील देशभरातील एआयबीइएचे सभासद २० मार्च रोजी एक दिवसाच्या देशव्यापी संपावर जात आहेत.हा संप प्रामुख्याने सर्व स्तरातील कर्मचाऱ्यांच्या भरतीसाठी आहे. बँकेने २०२१ मधे सफाई कर्मचारी हे पदच रद्द केले. हे काम आऊटसोर्स केले. त्यांना किमान वेतन देखील दिले जात नाही. कायम स्वरुपी कामगारांचे फायदे जसे की रजा, मेडिकल , सुट्ट्या कांहीच मिळत नाही. या पदावर अनेक वर्षांपासून तात्पुरत्या पदावर काम करणारे हजारो कर्मचारी यामुळे रस्त्यावर आले आहेत. बँकेत ७०० शाखेतून नियमित शिपाई नेमण्यात आलेले नाहीत. बँकेत ३१८ शाखा आहेत जेथे एकही क्लार्क नेमण्यात आला नाही. १२९० शाखा आहेत जेथे केवळ एक क्लार्क आहे जो कॅश मध्ये काम करतो. यामुळे कर्मचाऱ्यांना वेळ संपली तरी जास्त वेळ बसून काम पूर्ण करून जावे लागते. सुट्टीच्या दिवशी कामावर यावे लागते. आजारपण असो की सांसारिक जबाबदाऱ्या यासाठी आवश्यकतेनुसार राजा मिळत नाही. काम आणि वैयक्तिक आयुष्य यातील समतोल बिघडला आहे. कर्मचारी सतत ताण-तणावात काम करत आहेत. त्यामुळे सतत आजारी पडत आहेत असे बँक कर्मचाऱ्यांचे नेते कॉम्रेड उत्तम होळीकर म्हणाले.

तसेच ते पुढे म्हणाले की या सर्व गोष्टींचा ग्राहक सेवेवर देखील विपरीत परिणाम होत आहे. एकीकडे ग्राहकांची संख्या वाढली आहे , त्यांच्या आपेक्षा वाढल्या आहेत तर दुसरीकडे कर्मचाऱ्यांची संख्या मात्र कमी झाली आहे. यासाठीच कर्मचाऱ्यांचा आग्रह आहे की बँकेने त्वरित सर्व स्तरातील कर्मचाऱ्यांची पुरेशी भरती करावी.

याशिवाय कमी कर्मचाऱ्यात अधिक काम , यात बँकेचे नियम काटेकोरपणे पाळल्या जात नाहीत आणि त्यातूनच फ्रॉडस होण्याची शक्यता निर्माण होते न्हवे होत आहेत. यात बँकेचे तसेच ग्राहकांचे नुकसान होत आहे. याला जबाबदार कोण ? बँक यावर संवेदनशील नाही म्हणूनच २० मार्चला महा बँकेत संप अटळ बनला आहे.

या शिवाय बँक कर्मचारी संघटनांशी केलेले करार, हायकोर्टाचे आदेश सगळेच धाब्यावर बसवून बँक व्यवस्थापन मनमानी करत आहे. यामुळे कर्मचाऱ्यात संतापाची भावना निर्माण झाली आहे .

आज महा बँकेतील कर्मचाऱ्यांनी आंदोलनाचा एक कार्यक्रम झोनल ऑफिस समोर धरणे या अंतर्गत महा बँकेच्या लातूर स्थित औसा रोड येथील येथील झोनल ऑफिस समोर दुपारी १२ ते सायंकाळी ५ पर्यंत धरणे धरली व सायंकाळी पाच वाजता स्थानिक इतर बँकेतील कर्मचाऱ्यांच्या सहभागातून प्रखर निदर्शने केली ज्यात ५० पेक्षा अधिक कर्मचारी सहभागी झाले होते. यानंतर सभासदांना संबोधित करताना संघटनेचे नेते कॉम्रेड दीपक माने यांनी सांगितले की आजच्या दिवशी क्लार्कच्या दोन हजार, शिपायांच्या एक हजार तर सफाई कामगारांच्या पंचवीसशे जागा रिकाम्या आहेत त्या त्वरित भरण्यात याव्यात अशी संघटनेची मागणी आहे ज्याचा केवळ कर्मचाऱ्यांनाच त्रास होत नाही तर ग्राहकसेवेवर देखील त्याचा विपरीत परिणाम होत आहे. या शिवाय यामुळे बँकेत फ्रॉड देखील होत आहेत. याशिवाय बँक व्यवस्थापन कर्मचाऱ्यांशी संबंधित प्रश्नावर मान्यताप्राप्त संघटनेशी चर्चा न करता कायदे धाब्यावर बसवून मनमानी निर्णय घेत आहे ज्यावर संघटनेने तीव्र आक्षेप घेतला आहे. महा बँकेच्या धरणे कार्यक्रमाला पाठिंबा दर्शविण्यासाठी शिक्षक संघटनेचे जिल्हाध्यक्ष सुनील कुमार हाके सर, ग्रामसेवक संघटनेचे जिल्हाध्यक्ष अनंत सूर्यवंशी, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाचे कॉमेड संजय मोरे, आम आदमी पक्षाचे कॉम्रेड विक्रांत शंके, ग्रामीण बँक अधिकारी संघटनेचे कॉम्रेड राहुल सावंत व कॉम्रेड प्रीतम गिरी गोसावी , ए आय बी ई ओ चे कॉम्रेड विवेक पदरे, नोबोचे संतोष मोलगे इत्यादी सर्वांनी उपस्थित समुदायास मार्गदर्शन करून कर्मचाऱ्यांच्या न्याय मागण्यासाठी त्यांच्या संघटनांचा व पक्षांचा पाठिंबा बँक ऑफ महाराष्ट्र मधील कर्मचाऱ्यांच्या संघटनेस जाहीर केला.

महाबँकेच्या ग्राहकांनी आमची भूमिका समजून घ्यावी आणि आमच्या संपाला पाठिंबा द्यावा असे संघटनेतर्फे नम्र आवाहन करण्यात आले आहे.

हा धरणे कार्यक्रम यशस्वी करण्यात कॉम्रेड महेश घोडके, कॉम्रेड गजानन औटी, कॉम्रेड उदय मोरे , कॉ. सुधीर मोरे इत्यादींनी परिश्रम घेतले.


# आवाजहीनांचे आवाज व्हा - ॲड सुमेध गायकवाड

केज/प्रतिनिधी पाऊसिबल निमल वेल्फेअर फाउंडेशन तर्फे केज शहरात प्राण्यांच्या संरक्षणासंदर्भात कायदेशीर जनजागृती व अन्न वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या स्थळी कायदेशीर जनजागृती ,भूतदया व संविधानातील मूलभूत कर्तव्य ५१ ए जी याची माहिती देण्यात आली व प्राण्यांपासून होणारे हल्ले त्यांची कारणे व त्याचे निवारणासाठीचे मार्गदर्शन कार्यक्रमाच्या वेळेस करण्यात आले त्यासाठी नागरिकांनी व प्रशासनाने लसीकरण, नसबंदी व अन्नदान करून या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले. सदरील कार्यक्रमास फाउंडेशनचे संस्थापक ड.सुमेध गायकवाड,ड. अशोक माने, श्रद्धा सानप,ड. दिनकर सपाटे,ड.राहुल गायकवाड , ड संजय मिसळे,ड.क्रांती तांदळे, ड.अनमोल देवधरे, ड.भाऊसाहेब यादव, राहुल माने, शोभाताई गायकवाड, प्रणाली माने,









दिपाली माने आदी उपस्थित होते.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE